**राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षिका व महिला शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रसुती रजेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन शुध्दीपत्रक, क्रमांक- एसएसएन-१००९/(३८६/०९)/माशि-२**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- २५ मार्च, २०१३.**

**संदर्भ** १) शासन निर्णय क्रमांक एसएसएन-१००९/(३८६/०९)/माशि-२, दिनांक ८ मार्च, २०१०.

**प्रस्तावना -**

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षिका व महिला शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रसुती रजेबाबतच्या तरतुदी महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम १६ मधील पोट - नियम १४ (अ) व (ब) तसेच पोट - नियम १५, १६ व १७ मध्ये विहित केलेल्या आहेत. संदर्भाधीन दिनांक ८ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील अट क्र.४ मधील तरतूद ही संविधानातील समानता आणि सामाजिक न्यायाच्या भूमिकेशी व विविध तरतुदींशी विसंगत असून सदर तरतूद वगळण्याबाबत सातत्याने होणारा पाठपुरावा विचारात घेऊन तसेच राज्य शासनाचे महिला सक्षमीकरणाचे धोरण विचारात घेता महिलांना प्राप्त निसर्गदत्त अधिकारानुसार प्रसूती रजेबाबतच्या संदर्भाधीन क्र.१ च्या दिनांक ८ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील अट क्र.४ रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दीपत्रक**

उपरोक्त बाबी विचारात घेता संदर्भाधीन दिनांक ८ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील अट क्र.४ या शुध्दीपत्रकाच्या दिनांकापासून रद्द करण्यात येत आहे.

२. यापुढे महिला शिक्षण सेवकांना अनुज्ञेय असणारी १८० दिवसांची प्रसूती रजा मंजूर केल्यास त्यांचा शिक्षण सेवक पदाचा कालावधी त्या प्रमाणात वाढणार नाही.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१३०३२५१६०२३४८७२१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र. सु. प्रधान)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - २, नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - २, नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
संचालक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
सहसंचालक (स्थानिक निधी लेखा) सर्व विभाग
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सह सचिव (प्रशासन / प्राथमिक / माध्यमिक) व उपसचिव (अर्थसंकल्प / समन्वय)
शिक्षण संचालक, प्राथमिक /माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई (पश्चिम/उत्तर/दक्षिण)
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद
सर्व अधीक्षक, वेतन पथक (प्राथमिक / माध्यमिक)
नगर विकास विभाग / ग्रामविकास व जलसंधारण विभाग / आदिवासी विकास विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती माशि-२.

---